**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३६४/२०१९**
**निशाणी क्र. ५**

**<u>निशाणी क्र. ५ खालील आदेश</u>**
**( पारित दिनांक ४ एप्रिल, २०२२ )**

सदरचा अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ (कौटूंबिक हिंसाचार कायदा) चे कलम २३ अन्वये अंतरिम खावटी तसेच भाडेपोटी दरमहा रक्कम मिळणेकरीता केला आहे. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.०१ ची पत्नी आहे. गैरअर्जदार क्र.०२ ते ०६ हे गैरअर्जदार क्र. १ चे आई—वडिल व नातेवाईक आहेत.

**<u>अर्जातील संक्षिप्त माहिती —</u>**

**०२.** अर्जदार व गैरअर्जदार क्र.०१ यांचे लग्न दिनांक ०२.०४. २०१७ रोजी झाले. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदारांकडे नांदावयास गेली. सदर विवाहापासुन अर्जदार यांना कोणतेही अपत्य नाही. सुरुवातीस तिला चांगले वागविले परंतु नंतर तिचा छळ गैरअर्जदारांनी सुरु केला. गैरअर्जदार क्र.०१ अर्जदार यांना सतत गलिच्छ भाषेत शिवीगाळ करत असत. अर्जदार यांनी गैरअर्जदार क्र. १ वर पोलीस स्टेशनमध्ये ३५४ चा गुन्हा दाखल केला आहे. तसेच पहिल्यांदा शारिरीक संबंध ठेवतेवेळी विचारणा केली की तुझी पहिलीच वेळ आहे का असे प्रश्न विचारुन अर्जदाराचा गैरअर्जदाराने मानसिक छळ केल्याचे कथन केले आहे. अर्जदार यांच्याजवळील सोने आणि पैसे यांची मागणी केली होती आणि कमी पडले तेव्हा माहेरुन आई—वडिलांकडुन घेउन येण्यास सांगितले. अर्जदार यांचे लग्न गैरअर्जदार क्र. २ ते ६ यांना मान्य नसल्यामुळे ते नेहमी अर्जदार यांच्या समोर हाताचे बोटे मोडत आणि अपशब्द वापरत होते. अर्जदार यांना गैरअर्जदाराने

ब—याच वेळा मारहाण करुन एकदा गॅलरीमधुन खाली ढकलुन देण्यात आले होते. गैरअर्जदाराने अर्जदार यांना सक्त ताकीद दिली होती की आई, वडिल, भाउ व इतर कोणत्या नातेवाईकांना भेटायचे नाही आणि त्यांच्यासोबत फोनवर बोलायचे नाही. अर्जदार यांना नोकरी करण्याची ईच्छा असतांनाही त्याना गैरअर्जदार नोकरी करु देत नव्हते व त्याकामी नेहमी शिवीगाळ व मुद्दाम भांडणे करत. गैरअर्जदार १ व ३ यांनी अर्जदार यांना फकत साडीच घालायची ड्रेस घालायचा नाही अशी सक्त ताकीद दिली होती. गैरअर्जदार क्र. १ यांचे गैरअर्जदार क्र. ६ यांच्या मुलीशी प्रेमप्रकरण होते. शेवटी दिनांक ३१.०५.२०१७ रोजी अर्जदार यांना गैरअर्जदार यांना जबरदस्तीने बाहेर काढुन दिले. तेव्हापासुन अर्जदार हे आपल्या माहेरी राहत आहे. दि. १३.१२.२०१८ रोजी गैरअर्जदार क्र. १ ते ६ विरुध्द इचलकंरजी पोलीस स्टेशनमध्ये भा. द.वि. कलम ४९८ अ, ३५४, ५०९, ३२६ व ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तसेच अर्जदाराने गैरअर्जदार क्र.०१ यांच्या विरुध्द मे. जिल्हा न्यायालय, पुणे येथे मॅरेज पिटीशन क्र. २६९/२०१८ नांदण्यास नेण्यासाठी हुकुम व्हावा यासाठी दाखल केले असुन ते आज रोज प्रलंबित आहे. वरील सर्व कारणांसाठी व अर्जात नमुद कारणांसाठी गैरअर्जदाराने अर्जदाराचा मानसिक व शारिरीक छळ केल्याचे कथेन केले.

**०३.** गैरअर्जदार क्र. १ व त्यांचे कुटुंबियाचे निपाणी येथे दोन मजली वडिलोपार्जीत घर मिळकत असुन त्यातील खोल्या भाडयाने दिलेल्या असुन त्यातुन त्याने दरमहा रुपये २०,०००/— इतके भाडे मिळते. गैरेअर्जदार क्र. २ यांचा टॅक्स कसंलटंस चा व्यवसाय असुन त्यातुन त्यांना दरमहा रुपये ४०,०००/— इतके उत्पन्न मिळते. गैरअर्जदार क्र. ४ हे इंजिनियर असुन त्यांना रुपये ६०,०००/— दरमहा

पगार मिळतो. गैरअर्जदार क्र. १ हे स्वता सी.ए. असुन त्यातुन त्यांना दरमहा रुपये ५०,०००/— इतका पगार मिळतो. या सर्व बाबींच्या आधारे अर्जदाराने गैरअर्जदारांविरुध्द कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत मुळअर्ज दाखल केला आहे. तो अर्ज निकाली निघण्यासाठी काही अवधी लागू शकतो. दरम्यान अर्जदार हिने या अर्जाव्दारे तिस एकुण रुपये ५०,०००/— दरमहा तात्पुरता उदरनिर्वाह म्हणजेच अंतरिम खावटी मिळावी अशी प्रार्थना केली आहे. तसेच अर्जदाराने अर्जाची खर्च रक्कम म्हणुन गैरअर्जदाराकडुन रुपये २०,०००/— ची मागणी केली आहे व भाडयापोटी गैरअर्जदार यांनी दरमहा १०,०००/— व भाडयाच्या खोलीच्या डिपॉझिटसाठी रुपये ५०,०००/— देण्याचा हुकुम होण्यासाठी अर्ज केला आहे.

**०४.** गैरअर्जदार क्र.०१ व ०६ प्रकरणात हजर झाले. त्यांनी प्रस्तुत अर्जाबाबत त्यांचे म्हणणे नि.क्र. २१ अन्वये दाखल केले. अर्जदार क्र.०१ ही गैरअर्जदार क्र.०१ ची पत्नी असल्याचे त्याने मान्य केले आहे. परंतु अर्जातील इतर सर्व मजकूर गैरअर्जदारांनी नाकारला आहे. त्यांच्या कथनानुसार, लग्नानंतर पाच दिवसात गैरअर्जदार क्र. १ यांनी इचलकरंजी व निपाणी येथे त्या राहणार नाहीत, त्यांचे बि.ई. कॅम्पुटर झाले असुन त्यांना इंजिनियर नोकरी करायची असे म्हणुन गैरअर्जदार क्र. १ यांना आपण पुण्यातच राहु असा हट्ट करत असत. अर्जदार गैरअर्जदार क्र. १, २, ३ व इतर नातेवाईकांना उर्मठ व उध्दट भाषेत उत्तरे देत. अर्जदार त्यांच्याकडे नांदत असतांना त्यांना दि. ०८. ०४.२०१७ रोजी त्यांना ताप आला व त्या आजारी पडल्यामुळे गैरअर्जदारांनी त्यांच्यावर औषधोपचार केले. परंतु हिला ताप येण्याचा आजार हा जुनाट असल्याची कल्पना त्यांचे कुटुंबियांनी गैरअर्जदार यांना दिलीच नाही. अर्जदार यांनी लग्नानंतर त्यांचे कोणतेही सांसारिक

जबाबदारी कडे लक्ष दिलेले नाही. दि. ३१.०५.२०१७ रोजी अर्जदार यांचे आई–वडिल गैरअर्जदार यांचे घरी येउन अर्जदाराची मामी आजारी असल्याचे खोटे कारण सांगुन घेउन गेले व जातांना अंगावरील सर्व सोन्याचे दागिने, कपडे, दैनदिंन वापरीती सर्व साहित्य व माहेरुन आणलेल्या सर्व वस्तु घेउन स्वतःहुन गैरअर्जदार क्र. १ हे बाहेरगावी असतांना परस्पर निघुन गेल्या. गैरअर्जदारांनी नांदायला यावे म्हणुन बरेच प्रयत्न केले, परंतु अर्जदार नांदायला आले नाही. गैरअर्जदार क्र. १ ने त्यांच्या वकिलांमार्फत अर्जदारास दि. ०५.०२.२०१८ रोजी नांदायला येण्यासाठी नोटीस पाठवुन देखील नांदायला आल्या नाही. म्हणुन गैरअर्जदार क्र. १ यांनी इचलकंरजी येथील न्यायालयात अर्जदारविरुध्द हिंदु विवाह अर्ज क्र. ६२/२०१८ नांदावयास यावे म्हणुन दाखल केला असुन तो सध्या न्यायप्रविष्ठ आहे. अर्जदार हिने गैरअर्जदारांना फकत त्रास देण्याच्या दृष्टीने खोटा गुन्हा दाखल करुन ही खोटी तक्रार दाखल केली आहे.

**०५.** गैरअर्जदार असे देखील कथन करतात की, गैरअर्जदार क्र ०१ यांच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. त्यांचे वडिल वृध्द असल्याने कोणतेही काम करु शकत नाही. तसेच भाउ व त्याची पत्नी नोकरी निमीत्ताने स्वंतत्र राहतात. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ यांची अर्जदारास पोटगी देण्याची ऐपत नाही. उलटपक्षी, अर्जदार ही उच्च शिक्षीत मुलगी असुन ती पुणे येथे खाजगी नोकर करुन दरमहा रुपये २५,०००/– कमविते व त्यामुळे ती स्वतःचा उदरनिर्वाह करणेस समर्थ आहे. म्हणुन अर्जदार यांना गैरअर्जदाराकडुन मिळण्याचा अधिकार नाही.

**०६.** अर्जदार यांनी निशाणी क्र. २१ अन्वये तिचे मालमत्ता व जबाबदारी यांचे प्रतिज्ञापत्र न्यायालयात सादर केले आहे. उलटपक्षी,

गैरअर्जदांनी निशाणी क्र. १ खाली दि. २८.१०.२०२१ रोजी आदेश पारित करुन देखील अभिलेखावर त्याचे मालमत्ता व जबाबदारी यांचे प्रतिज्ञापत्र दाखले केलेले नाही. अर्जदार यांचे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. गैरअर्जदार व त्यांचे विधीज्ञ वेळोवेळी पुकारले असता गैरहजर. सबब सदरचा अर्ज त्यांच्या बिना युक्तीवाद चालविण्यात आला. तसेच संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्ज निकाली निघण्याकरिता उपस्थित होणारे प्रश्न व त्यांची कारणमिमांसेसहित उत्तरे खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **उत्तर** |
|---|---|---|
| **०१** | अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार झाला आहे असे ती प्रथमदर्शनी शाबीत करते काय? | ..होय |
| **०२** | अर्जदार अंतरिम खावटी मिळणेस पात्र आहे काय? असल्यास, किती? | दरमहा रु.१५,०००/— प्रमाणे |
| **०३** | आदेश काय? | अर्ज अंशत: मंजूर |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>प्रश्न क्र.०१ करिता</u>** :—

**०७.** कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत कोणताही आदेश मिळण्याकरिता अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार झाल्याचा प्रथमदर्शनी पुरावा उपलब्ध आहे असेन्यायालयाचे समाधान होणे आवश्यक आहे. कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत हिंसाचाराची व्याख्या व्यापक स्वरुपात केलेली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या मुळ व प्रस्तुत अर्जातील आरोप जसे की, अर्जदाराकडे माहेरुन पैशाची मागणी करणे, त्यासाठी तीस मारहाण करणे, शिविगाळ करणे, गॅलरीत ढकलुन देणे, अश्लील भाषेत शिवीगाळ करणे इत्यादी बाबी या कौटुंबिक हिंसाचार या संज्ञेच्या

कक्षेत येतात. गैरअर्जदारांनी मुळ अर्जास नि.क्र.२१ अन्वये लेखी जबाब दाखल केला आहे. त्यातील कैफियतसुध्दा शपथेवर नमूद केली आहे. परंतु पुराव्याअभावी ती कैफियत याक्षणी अर्जातील प्रथमदर्शनी कथनास पुसून टाकू शकत नाही. संरक्षण अधिकारी यांचा कौटुंबिक घटना अहवाल या प्रकरणात उपलब्ध आहे. सरंक्षण अधिाकरी यांनी देखील कौटंबिक घटना अहवाल नि. क्र. १५ वर दाखल केलेला असुन त्यांनी सुध्दा अर्जदार यांना गैरअर्जदार यांना हिसांचार केल्याच्या कथनास दुजोरा दिला आहे. अर्जदाराने सदरचा अर्ज तसेच त्यासोबत शपथपत्र देखील दाखल केले आहे. त्यामुळे कौटुंबिक घटनेचा अहवाल प्रस्तुत अर्जाच्या निकालाकरीता उपलब्ध असुन सदरचा अर्ज निकाली काढतांना त्यातील कथनांचा देखील विचार करता येईल असे या न्यायालयाचे मत आहे. म्हणून अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार झाला आहे असा प्रथमदर्शनी पुरावा असल्याचे या न्यायालयाचे समाधान झाले आहे. म्हणून मी प्रश्न क्र.०१ चे उत्तर होकारार्थी नोंदविला आहे.

**<u>प्रश्न क्र. ०२ करिता</u>** :—

**०८.** गैरअर्जदार क्र.०१ ने अर्जदार क्र.०१ ही त्याची पत्नी असल्याचे मान्य केले आहे. परंतु त्यांच्या मते ती तिच्या स्वेच्छेने तिच्या माहेरी राहत आहे असे कथन केले आहे. अर्जदार ही उच्च शिक्षित मुलगी असुन तिला दरमहा रुपये २५,०००/— एवढा पगार मिळतो व ती तिचा उदरनिर्वाक करण्यास सक्षम आहे, असे गैरअर्जदारांचे कथन आहे. उलटपक्षी, गैरअर्जदार हा कोणत्याही कामधंदयास नाही, त्यामुळे तो गैरअर्जदारास अंतरिम खावटी साठी पैसे देउ शकत नाही, असे कथन केले आहे. या सर्व कथनांआधारे अर्जदार क्र.०१ खावटी मिळण्यास पात्र नाही असे गैरअर्जदारांचे म्हणणे आहे. परंतु संपुर्ण प्रकरणाचे अवलोकन केले असता तसेच हिंसाचाराचा प्रथमदर्शनी पुरावा उपलब्ध

असतांना अर्जदाराने तिच्यावर हिंसाचार होत असतांना देखील गैरअर्जदारांकडे राहावे असे कायद्यास अपेक्षित नाही. म्हणून ती कुठल्याही सबळ कारणाशिवाय स्वेच्छेने माहेरी राहत आहे असे म्हणता येणार नाही. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.०१ ची पत्नी असल्याने तिचा सांभाळ करणे हे गैरअर्जदार क्र.०१ चे आद्यकर्तव्य आहे. त्यातुन गैरअर्जदार क्र.०१ उपलब्ध पुराव्याआधारे स्वत:ची सुटका करुन घेवू शकत नाही. म्हणून अर्जदार ही खावटी मिळणेस पात्र आहे असे या न्यायालयाचे स्पष्ट मत आहे.

**०९.** खावटी या संज्ञेचा अर्थ फक्त अन्न, वस्त्र व निवारा नसून अर्जदाराच्या वैदयकिय खर्चाचाही त्यामध्ये समावेश होतो. गैरअर्जदार क्र. ०१ ज्या प्रतीचे आयुष्य जगत आहे त्याच प्रतीचे आयुष्य अर्जदार जगण्याचा हक्क आहे. त्यासाठी योग्य ती तरतूद करण्याचे कर्तव्य गैरअर्जदार क्र.०१ चे आहे. अर्जातील कथनानुसार गैरअर्जदार क्र.०१ सी.ए. च्या व्यवसायातून मिळणा—या उत्पनातून दरमहा ५०,०००/— रुपये देवू शकतो असे नमूद केले आहे. परंतु या कथनास पुष्टी देणारा कोणताही कागदोपत्री पुरावा याक्षणी उपलब्ध नाही. तसेच अर्जदार ही एक कमावती स्त्री आहे असे दाखविणाराही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. परंतु गैरअर्जदार क्र.०१ हा धडधाकट पुरुष आहे. त्याने त्याचे मालमत्ता व जबाबदारीचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. त्याला कोणतेही अपंगत्व असल्याने तो कार्य करु शकत नाही अशी कोणतीही कैफियत केलेली नाही. म्हणून तो कोणतेही उत्पन्न कमवित नाही असा निष्कर्ष काढणे योग्य नाही. सदरचा अर्ज पुराव्याअंती निकाली निघण्याकरीता काही दिवस लागू शकतात. अशा परिस्थितीत अर्जदारास कोणत्याही मदतीविना ठेवणे न्यायोचित नाही. अर्जदाराने अभिलेखावर तिच्या वैदयकिय खर्चापोटी

औषधोपचार घेतल्याचे कागदपत्रे दाखल केले आहे. प्रकरणातील एकंदरीत परिस्थती व प्राथमिक पुरावे पाहता या न्यायालयाचे असे मत आहे की, गैरअर्जदार क्र.०१ हा त्याचे मालमत्ता व जबाबदारची प्रतिज्ञापत्र दाखल न करुन स्वत:चे उत्पन्न लपविण्याचा प्रयत्न करित आहे. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार यांना अर्ज दाखल तारखेपासुन अंतरिम खावटीसाठी कोणतेही मदत केलेली नाही. अथवा त्याबद्दल त्यांच्या कथनात देखील नमुद केलेले नाही. अर्जदार ही दि. ३१.०५.२०१७ पासुन तिच्या आई—वडिलांकडे माहेरी राहत आहे. सध्या ती भाडयाने राहत असल्याचे अभिलेखावर दिसुन येत नाही. त्यामुळे अर्जदारास भाडयापोटी काही रक्कमे विषयी आदेश करावा, असे या न्यायालयाचे मत नाही. यामुळे अर्जदार हिस तिचा सांभाळ व वैदयकिय खर्च करण्याकरिता दरमहा रु.१५,०००/— अंतरिम खावटी देवू शकतो. म्हणून प्रश्न क्र.०२ चे उत्तर देखील मी होकारार्थी नोंदविले असून प्रश्न क्र.०३ च्या उत्तराकरिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.क्र. ५ अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार क्र. १ याने सदरचा अर्ज दाखल तारखेपासून (दि. १५.०४.२०१९)अर्जदारांना दरमहा रुपये १५,०००/— (पंधरा हजार रुपये मात्र) अन्न, वस्त्र आणि औषधपाणी याकरीता द्यावेत.

३. सदर आदेशाची प्रत अर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावी.

Ravi Magan Giri
Digitally signed by Ravi Magan Giri
Date: 2022.04.05 18:34:24 +0530

पिंपरी.
दि. ०४.०४.२०२२

( र. म. गिरी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
पिंपरी, पुणे.

**<u>– प्रमाणपत्र –</u>**

मी, प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : श्रीमती किर्ती उदय पवार |
| न्यायालयाचे नांव | : श्री. र. म. गिरी न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपरी पुणे. |
| न्यायनिर्णयाचे दिनांक | :०४.०४.२०२२ |
| न्यायीक अधिकाऱ्यांनी सही केल्याचे दिनांक | :०५.०४.२०२२ |
| पी.डी.एफ.फाईल अपलोड केल्याचा दिनांक | : ०५.०४.२०२२ |

स्वाक्षरीत/–
लघुलेखक(श्रेणी–iii)